# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः03.10.2025** **वारःशुक्रवार**

1. दसऱ्याचा सण राज्यभरात उत्साहात साजरा
2. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा शंभरावा विजयादशमी उत्सव उत्साहात; नैतिक मूल्यांवर आधारित राजकारणातील सहभाग, जनसेवेचं प्रभावी माध्यम असल्याचं माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचं प्रतिपादन
3. एकोणसत्तराव्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपुरात बौद्ध अनुयायांचं दीक्षाभूमीवर अभिवादन आणि
4. अहमदाबाद कसोटीत वेस्ट इंडिजचा पहिला डाव 162 धावांत संपुष्टात, भारताची सावध सुरुवात

**विजयादशमी**

साडे तीन मुहूर्तांपैकी एक असलेला दसऱ्याचा सण काल राज्यात उत्साहात साजरा झाला. अनेक ठिकाणी झालेली अतिवृष्टी आणि पुराचं सावट या दसऱ्याच्या सणावर होतं, मात्र तरीही विविध भागात परंपरेनुसार हा सण साजरा करण्यात आला. तुळजापूरमध्ये पारंपरिक सीमोल्लंघन सोहळा पार पडला. नाशिकच्या काळाराम मंदिरामध्ये श्री रामाची पालखी काढण्यात आली. कोल्हापूरच्या ऐतिहासिक दसरा चौकात काल मावळत्या सूर्याच्या साक्षीनं शाही दसरा उत्सव मोठ्या उत्साहात आणि राजेशाही थाटात झाला. साताऱ्यातही प्रथेप्रमाणं शाही सीमोल्लंघन सोहळा खासदार उदयनराजे भोसले यांच्या उपस्थितीत पार पडला. जलमंदिर पॅलेस इथून भवानी तलवारीची पालखी मिरवणूक काढण्यात आली. पोवईनाका इथं शस्त्रपूजन होऊन सीमोल्लंघन पार पडले. यावेळी हजारो सातारकरांनी सोनं लुटत दसरा साजरा केला. लातूर जिल्ह्याच्या शिरूर अनंतपाळ तालुक्यातील कळमगाव इथं पुरातन लेणी परिसरातील माता वैष्णोदेवी मंदिरात, दसऱ्यानिमित्त मोठी गर्दी झाली होती. शिर्डी इथं 107 व्या पुण्यतिथी उत्सवानिमित्त लाखो साईभक्तांनी श्री साईबाबांच्या समाधीचं दर्शन घेतलं.

**आरएसएस**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघानं काल शंभरावा विजयादशमी उत्सव नागपूरच्या रेशीमबाग मुख्यालयात साजरा केला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद उपस्थित होते. याप्रसंगी सरसंघचालक मोहन भागवत आणि माजी राष्ट्रपती कोविंद यांनी मार्गदर्शन करत संघाच्या कार्याचा, राष्ट्रीय ऐक्याचा आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला. नैतिक मूल्यांवर आधारित राजकारणात सहभाग घेणं हे जनसेवेचं प्रभावी माध्यम असल्याचं प्रतिपादन यावेळी रामनाथ कोविंद यांनी केलं. तर भौतिक विकासासोबत नैतिक विकासाची गरज सरसंघचालक मोहन भागवत यांनी अधोरेखित केली. गेल्या 100 वर्षातील संघाच्या वाटचालीचा पाया हा महापुरुषांच्या चिंतनापासून वेगळा नसल्याचा उल्लेख त्यांनी केला. आपल्या भाषणात ते म्हणाले.....

**स्वामी विवेकानंद से लेकर तो महात्मा गांधी जी, दीनदयाल उपाध्याय, राम मनोहर लोहिया जी तक इन सब लोगों ने इस प्रकार की दृष्टि को सामने रखते हुए कुछ चिंतन दिया है। उसकी तफसील उसके अलग अलग होंगे, परंतु उसकी दिशा एक ही है, संघ का चिंतन नया नहीं है। वो अपनी दृष्टि के आधार पर अपने यहाँ परंपरा से चलने वाला आज तक आया हुआ यहाँ तक चिंतन है, उस चिंतन को लेकर संघ सौ साल से काम कर रहा है। समाज जीवन के विभिन्न आयाम में संगठनों में, संस्थाओं में, स्थानीय स्तर पर भी व्यक्तिगत पहल से भी स्वयं सेवक सक्रिय है। समाज जीवन में सक्रिय ऐसे अनेक सज्जनों के साथ भी सहयोग और संवाद स्वयंसेवकों का चलता रहता है। इन सबका जो संकलित अनुभव है उसके आधार पर संघ का कुछ चिंतन है। वो चिंतन आज के कार्यक्रम में आपके सामने रखना ये मेरे भाषण का प्रमुख उद्देश्य है।**

राज्यात सर्वत्र काल सकाळी संघाचं शिस्तबद्ध संचलन पार पडलं. नागरिकांनी पथसंचलनाचं जल्लोषात स्वागत करत पुष्पवृष्टी केली.

**जयंती**

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांची जयंती काल देशभरात साजरी करण्यात आली. नवी दिल्लीत राजघाट इथं, महात्मा गांधींच्या समाधीस्थळी, सर्वधर्म प्रार्थनेचं आयोजन करण्यात आलं होतं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह, अनेक नेत्यांनी राजघाट इथं, पुष्पांजली अर्पण केली. लोकसभेतले विरोधी पक्ष नेते, राहुल गांधी यांनीही, राष्ट्रपिता महात्मा गांधींना आदरांजली वाहिली. आयुष मंत्रालयाच्या वतीनं पुण्यात नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ नॅचरोपॅथी संस्थेमध्ये केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते 'महात्मा गांधी वेबथॉन' या पुस्तकाचं प्रकाशन करण्यात आलं. राज्यातील विविध महापालिकांनी महात्मा गांधी जयंतीनिमित्त स्वच्छता मोहीम राबवली. मध्य रेल्वेनंही मुंबईत स्वच्छता मोहीम राबवली.

**धम्मचक्र प्रवर्तन दिन-नागपूर**

एकोणसत्तरावा धम्मचक्र प्रवर्तन दिन काल नागपूरमध्ये साजरा करण्यात आला. देशपरदेशातून लाखो बौद्ध अनुयायांनी पवित्र दीक्षाभूमीवर सकाळपासूनच अभिवादनासाठी गर्दी केली होती. ऐकूया याबाबतचा वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून...

**69 व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपुरातील दीक्षाभूमीवर आयोजित मुख्य सोहळ्याला देशभरातून आलेल्या लाखो अनुयायांनी हजेरी लाऊन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भगवान बुद्ध यांना अभिवादन केलं. दीक्षाभूमीवर संध्याकाळी झालेल्या मुख्य कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांनी भूषवले. यावेळी त्यांनी उपस्थितांना धम्मोपदेश दिला.**

**समारंभात भंते विनाचार्य यांनी महाबोधी विहाराच्या 134 वर्षांच्या लढ्याचा उल्लेख करून, ते बौद्धांच्या ताब्यात व्यवस्थापनासाठी देण्यात यावे यासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले. हरियाणा सरकारचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. राजशेखर वुंद्रु यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधान निर्मितीपासून ते 1956 मध्ये केलेल्या धम्मांतरापर्यंतच्या सामाजिक क्रांतीवर प्रकाश टाकला.**

**तत्पूर्वी सकाळपासून कामठी येथील ड्रॅगन पॅलेस टेम्पल परिसरातही बौद्ध अनुयायांची मोठी गर्दी झाली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंदिराला भेट देऊन तथागत गौतम बुद्धांच्या मूर्तीचं दर्शन घेतलं. यावेळी माजी मंत्री सुलेखा कुंभारे यांच्या नेतृत्वात आयोजित सामूहिक बुद्धवंदना कार्यक्रमात मुख्यमंत्री सहभागी झाले. आकाशवाणी बातम्यांसाठी नागपूरहून हेमांगी कुळकर्णी.**

**दसरा मेळावा**

दसऱ्याच्या दिवशी राज्यातील शेतकरी संकटात आहे, मात्र शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वीच मदत करण्याची ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल दिली. मुंबईतील गोरेगाव इथं शिवसेनेचा दसरा मेळावा पार पडला, त्यावेळी ते बोलत होते. लाडकी बहिण योजना कधीही बंद होणार नाही, असंही ते म्हणाले. मुंबईतील शिवतीर्थावरील उद्धव ठाकरे शिवसेनेच्या दसरा मेळाव्यात पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजार रुपये तत्काळ मदत जाहीर करण्याची मागणी केली.

**ऊस-हर्षवर्धन पाटील**

ऊसाच्या एफआरपीसोबत साखरेची एमएसपी जोडल्यास साखर उद्योगाला स्थैर्य येईल आणि शेतकऱ्यांना अधिक दर देता येईल असं मत राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी इंदापूर इथं व्यक्त केलं. मुंबईमध्ये नुकत्याच मंत्री समितीच्या बैठकीत साखर उद्योगासंदर्भातील विविध प्रश्नांवर झालेल्या चर्चेची माहिती देताना ते

म्हणाले की ऊसाची एफआरपीची रक्कम गेल्या 6 वर्षापासून वाढत्या उत्पादन खर्चामुळं प्रति टन सुमारे 650 रुपयांपर्यंत वाढली आहे. त्या तुलनेत साखरेच्या किमान विक्री दरामध्ये वाढ करण्यासाठी एफआरपी आणि एमएसपी यांना जोडणं आवश्यक आहे. याबाबत राज्य शासनानं केंद्राकडे प्रस्ताव पाठवावा, असं मंत्री समितीच्या बैठकीत ठरल्याचं हर्षवर्धन पाटील यांनी सांगितलं.

**कांदा-नाशिक**

विजयादशमीच्या मुहूर्तावर नाशिक जिल्ह्यातील उमराणे इथल्या कृषी उत्पन्न बाजार समितीत तसंच खारीफाटा इथल्या रामेश्वर कृषी मार्केटमध्ये कांदा लिलावाचा शुभारंभ करण्यात आला. मुहूर्ताच्या बैलगाडीतून आणलेल्या नवीन लाल कांद्याला रामेश्वर मार्केटमध्ये सर्वोच्च 5 हजार 555 रुपये, तर उमराणे बाजार समितीत सर्वोच्च 5 हजार 100 रुपये बाजारभाव मिळाला.

**मदत**

श्रीक्षेत्र गणपतीपुळे संस्थानकडून मराठवाड्यातील महापुरातील नुकसानग्रस्तांकरिता 42 लाख रुपये मदत पाठवण्यात आली आहे. मराठवाड्यातील विविध जिल्ह्यात आलेल्या महापुरामुळं नुकसान झालेल्यांना मदतीचा हात म्हणून मुख्यमंत्री सहाय्यता निधीला 21 लाख आणि पश्चिम महाराष्ट्र सेवा भारती या संस्थेला 21 लाखांची मदत धनादेशाद्वारे पाठवण्यात आली आहे. पालघर इथल्या श्री शितलादेवी आणि हनुमान मंदिर देवस्थान ट्रस्टनंही मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी दोन लाख रुपयांचा धनादेश जिल्हाधिकारी इंदूराणी जाखड यांच्याकडे सुपूर्द केला.

**निधन**

विख्यात चिंपांझी अभ्यासक आणि शास्त्रज्ञ जेन गुडाल यांचं वयाच्या 91 व्या वर्षी अमेरिकेत कॅलिफोर्निया इथं निधन झालं. निसर्ग इतिहासकार, जीव शास्त्रज्ञ आणि गुडाल यांचे 99 वर्षीय मित्र सर डेव्हिड ॲटनबरो तसंच प्रिन्स विल्यम यांनी गुडाल यांना श्रद्धांजली वाहिली आहे. महाकपिंच्या अभ्यासातून क्रांतिकारी शोध लावणाऱ्या जेन गुडाल यांचं जीवनकार्य संशोधकाच्या पिढ्यांसाठी अतिशय प्रेरणादायी असल्याची भावना जगभरातील मान्यवरांनी व्यक्त केली आहे.

**क्रिकेट**

अहमदाबाद इथं भारत आणि वेस्टइंडिज संघातील पहिल्या क्रिकेट कसोटी सामन्यात काल पहिल्या दिवशी वेस्ट इंडिज संघाचा डाव 162 धावांत संपुष्टात आला. वेस्ट इंडिज संघानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. पण मोहम्मद सिराजच्या भेदक गोलंदाजी पुढं त्यांचे फलंदाज खेळपट्टीवर टिकू शकले नाहीत. सिराजनं 40 धावांत 4 बळी घेतले तर बूमराहनं 3 गडी बाद केले. भारतानं डावाची सावध सुरुवात केली आणि सलामीवीर के एल राहुलच्या नाबाद 53 धावांच्या जोरावर पहिल्या दिवसअखेर 2 बाद 121 धावा केल्या.

**हवामान**

कोकण आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी विजांसह पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.